आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ डिसेंबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार

- समाज माध्यमांचा दुरुपयोग आणि फेक न्यूज प्रकरणी कठोर कारवाईची गरज असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्र्यांचं लोकसभेत प्रतिपादन

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संयुक्त रणनीतीवर चर्चा करण्यासाठी आज विरोधी पक्षांच्या नेत्यांची संसदेत बैठक

- श्रीलंकेत दितवाह चक्रीवादळात आतापर्यंत ४७४ जणांचा मृत्यू, ३५६ जण अद्याप बेपत्ता; ऑपरेशन सागर बंधू अंतर्गत भारताकडून श्रीलंकेला मोठी मदत

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

ज्या समाजात दिव्यांग व्यक्तींना समानतेची वागणूक दिली जाते, त्याच समाजाला खऱ्या अर्थानं विकसित म्हणता येईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं.

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू***

दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. दिव्यांगजनांनी विविध क्षेत्रांमध्ये, विशेषतः खेळांमध्ये मिळवलेलं यश म्हणजे सर्वांसाठी प्रेरणास्रोत असल्याचं सांगून गेल्या वर्षीच्या पॅरालिम्पिक्समध्ये २९ पदकं पटकावणाऱ्या भारतीय चमूचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज केरळमधे तिरुवनंतपुरम इथं नौदलाच्या ऑपरेशनल डेमो मधे प्रमुख पाहुण्या म्हणून सहभागी होणार आहेत. तिरुवनंतपुरम जवळच्या षण्मुगम

समुद्रकिनाऱ्यावर भारतीय नौदल प्रात्यक्षिकं करणार आहे. राष्ट्रपती मुर्मू या आज दुपारी तिरुवनंतरपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचतील. तिथून त्या कार्यक्रमासाठी रवाना होतील. या डेमोमधे १९ युद्धनौका आणि ३२ विमानं असतील. या प्रात्यक्षिकांमधून भारतीय नौदलाचं सामर्थ्य अधोरेखित होणार आहे. या कार्यक्रमानंतर राष्ट्रपती लोक भवन इथं जातील आणि उद्या सकाळी दिल्लीसाठी रवाना होतील.

**<><><><><>**

लोकसभेत आज सकाळी ११ वाजता नियमित कामकाजाला सुरुवात झाली. समाज माध्यमांचा दुरुपयोग आणि फेक न्यूजचा विषय अत्यंत गंभीर असून या दोन्ही बाबींवर तसंच एआयनिर्मित आक्षेपार्ह आशयांवरही कठोर कारवाई करणं गरजेचं आहे, असं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आज लोकसभेत म्हणाले. प्रश्नोत्तराच्या तासात या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते.

- **होल्ड... बाईट- अश्विनी वैष्णव -**

देशभरातली जवळपास शंभर टक्के रेशन कार्डं आता डिजिटल रुपात तयार झाल्याची माहिती केंद्रीय अन्न, सार्वजनिक वितरण आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ते बोलत होते.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संयुक्त रणनीतीवर चर्चा करण्यासाठी आज विरोधी पक्षांच्या नेत्यांनी संसदेत बैठक घेतली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पार्टी, झारखंड मुक्ती मोर्चा, सीपीआय एम, सीपीआय यासह विविध पक्षांचे नेते बैठकीला उपस्थित होते. मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण संदर्भात तसंच, संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी या बैठकीत चर्चा झाली.

दरम्यान, नवीन कामगार कायद्यांना विरोध करत विविध पक्षांच्या नेत्यांनी आज संसद भवनाबाहेर निदर्शनं केली. कामगार कायद्यातल्या तरतुदी कामगार हिताच्या विरोधी असून त्या मागे घेण्यात याव्यात, अशी मागणी या नेत्यांनी केली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानाचं नामकरण सेवा तीर्थ असं करण्यात आलं आहे. तसंच राजभवन आणि राजनिवास यांची नावं लोकभवन आणि लोकनिवास अशी करण्यात आल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. विकसित भारत निर्माण करण्याच्या प्रवासात हे एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं शहा म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार हे सत्तेचं नाही तर सेवेचं प्रतीक असून प्रधानमंत्री स्वतःला सेवक म्हणवून घेतात असं ते म्हणाले.

<><><><><>

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद यांना त्यांच्या जन्मदिवसानिमित्त आदरांजली वाहिली. राजेंद्र प्रसाद देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे नेते होते, संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी भारतीय संविधानाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान दिलं असं राधाकृष्णन आपल्या सोशल मीडिया पोस्टमधे म्हणाले. राजेंद्र प्रसाद यांचा साधेपणा, सचोटी आणि लोकशाहीप्रती असलेली निष्ठा येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असंही राधाकृष्णन म्हणाले.

<><><><><>

संचार साथी या ॲपमुळे खासगी आयुष्यात ढवळाढवळ होण्याचा किंवा नागरिकांवर लक्ष ठेवण्याचा कोणताही धोका निर्माण होत नसल्याचं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. उलट, यामुळे फसवणुकीचे प्रकार टाळणं, हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन ब्लॉक करणं, आपल्या नावावरची मोबाईल कनेक्शन तपासून अनधिकृत कनेक्शन रिपोर्ट करणं, मोबाईल हँडसेट खरा आहे किंवा नाही, हे तपासणं इत्यादी गोष्टी करणं नागरिकांना सोपं होईल, असं सरकारनं म्हटलं आहे.

<><><><><>

श्रीलंकेत आलेल्या दितवाह चक्रीवादळात आतापर्यंत ४७४ जणांचा मृत्यू झाला असून ३५६ जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती श्रीलंकेच्या आपत्ती व्यवस्थापन केंद्रानं दिली आहे. भारतानं श्रीलंकेला या काळात मोठी मदत केली असून वायुदल, नौदल आणि एनडीआरएफच्या पथकानं इथं भरीव मदतकार्य केलं आहे. भारतानं आयएनएस सुकन्या जहाजातून पाठवलेली मदतसामग्री श्रीलंकेच्या वायुदलानं हवाईमार्गे पोहोचवली आहे. भारतीय वायुदलानंही पूर्वेकडच्या प्रांतात अनेकांना आपल्या हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित स्थळी

हलवलं आहे. एनडीआरएफची तुकडी पुट्टालाम गावात तब्बल ८०० लोकांना मदत करत आहे. भारतीय वायुदलाच्या हेलिकॉप्टरांनी काल साडेपाच टन अन्नाची पाकिटं पूरग्रस्त भागात टाकली आहेत. भारताच्या सी - १७ ग्लोबमास्टर विमानाद्वारे तात्पुरती वैद्यकीय सुविधा उभारण्यासाठीचं साहित्य श्रीलंकेत पोहोचलं असून त्याबरोबर ७३ जणांचं वैद्यकीय पथकही तिथं गेलं आहे. या साहित्यात ऑपरेशन थिएटरपासून ते इतर वैद्यकीय उपकरणांचा, रुग्णवाहिकांचा आणि इतर वाहनांचा आणि सुविधांचा समावेश आहे. हे साहित्य कोलंबो इथं पोहोचलं असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी दिली आहे.

<><><><><>

मुंबईत ऑरेंज गेट टनेल ते मरीन ड्राईव्ह बोगदा प्रकल्पासाठी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते टीबीएमचा प्रारंभ करण्यात आला. पूर्व द्रुतगती महामार्गापासून पश्चिम भागात जाण्यासाठी होणारी वाहनांची कोंडी तसंच, नवी मुंबई भागात जाण्यासाठी लागणारा लांबचा पल्ला कमी करण्यासाठी ऑरेंज गेट बोगद्याची संकल्पना करण्यात आली, असं मुख्यमंत्री या उद्घाटनावेळी म्हणाले. या बोगद्यामुळे पूर्व द्रुतगती महामार्ग पश्चिमेला असणाऱ्या किनारी मार्गाला जोडणं शक्य होणार आहे. हा बोगदा भूमिगत असून सध्याच्या मेट्रो ३ प्रकल्पाच्याही ५० मीटर खालून तो जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या दुसरा सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या बिनबाद १० धावा झाल्या होत्या.

भारत सध्या या मालिकेत १-०नं आघाडीवर आहे. पहिला सामना भारतानं १७ धावांनी जिंकला होता. याशिवाय, या सामन्यात बरेच विक्रमही प्रस्थापित झाले. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षट्कार ठोकायचा विक्रम रोहित शर्मानं आपल्या नावावर केला. तसंच सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळायचा विक्रम रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या नावावर झाला.

<><><><><>

राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष पन्नालाल सुराणा याचं काल निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचं आज देहदान करण्यात येणार आहे.

<><><><><>

मध्य महाराष्ट्र आणि पंजाबमधे आज थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर केरळ, माहे, तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल इथंल्या काही भागात जोरदार पाऊस पडेल  असा अंदाज आहे. आंध्रप्रदेशात आज विजांचा कडकडाट आणि मेघगर्जना होण्याची शक्यता आहे. तर आसाम, मेघालय, हिमाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम , त्रिपुरा आणि ओदिशामधे धुक्याची चादर पसरलेली असेल.

दितवाह चक्रीवादळाचं कमी दाबाच्या पट्ट्यात रुपांतर झालं आहे. त्यामुळे तमिळनाडूच्या उत्तर भागात संततधार पाऊस सुरू आहे.

//<><><><><>//